प्रकरण पाचवे

# नाटय छटेतील साहित्य - कला सौंदर्याचा अभ्यास

## नाटयछटेतील साहित्य :

इंग्रजीतील 'Literature' या शब्दाचा मराठी प्रतिशब्द म्हणून साहित्य हा शब्द रुढ आहे. त्याचाच पर्यायी शब्द म्हणून 'वाड्.मय' शब्द रुढ आहे. साहित्य अथवा वाड्.मय हा कलेचाच एक प्रकार आहे. संस्कृततज्ञांनी साहित्याची व्याख्या करताना म्हटले - 'हितेन् साहित्यस् भावः। स + हित = साहित्य. अशी व्याख्या केली आहे. थोडक्यात काळ आणि अभिरुचीच्या जोड चाळणीमध्ये जे शिल्लक राहाते ते साहित्य होय.

मनुष्य हा नवनिर्मितीक्षम असा प्राणी आहे. तो सतत नाविण्याचा शोध घेत असतो. जीवनामध्ये त्याला अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. अनेक प्रकारची कार्ये करावी लागतात. त्यामुळेच त्याच्याकडून जाणता-अजाणता काहीतरी निर्मिती होत असते. मग ती वस्तुरुपाने असो किंवा वाड्.मयकृतीच्या रुपाने असो.

इथे आपल्याला दिवाकरांच्या नाटयछटांचा साहित्यदृष्टया विचार करावयाचा आहे. नाटयछटेच्या अनुषंगाने विचार करता दिवाकरांच्या प्रत्येक नाटयछटेतून कलासौंदर्य व्यक्त होत असताना दिसते. मानवी जीवनाच्या सुख-दुःखाचे भावस्पर्शीत्व रेखाटत असताना ते आपल्या सामाजिक नितीनियमनातून व्यक्त होताना दिसते. उदा. 'कोण मेले म्हणजे रडू येत नाही' यात समाजाची विधवेकडे पाहाण्याची दृष्टी किती भयंकर असते हे तर पहावयास मिळतेच. परंतु तिचे जीवन सुसह्य होईल यापेक्षा तिला अधिक दुःख कसे देता येईल असेच प्रयत्न होताना दिसतात. अशा प्रकारे साहित्यात मानवी मनातील मुलभूत भावनांचा अविष्कार असतो. यादृष्टीने दिवाकरांची अशा 'शुभदिनी रडून कसे चालेल ?' ही छटा अभ्यासण्यायोग्य आहे. या छटेत तरुण विधवा मुलीच्या मनातील भावना तितक्याच तरलपणे हळुवारपणे व्यक्त झालेल्या

आहेत. या आणि अशा इतर छटांतून सूचित अर्थ नेमकेपणाने व्यक्त झाला आहे. मुळातच दिवाकर भावुकवृत्तीचे आणि नाटयानुकूल मनोवृत्तीचे होते. त्यांच्या या गुणांची नाटयछटांवर एक विशिष्ठ छाप उमटली आहे."नाटयानुकूल मनोवृत्ती हे कलात्मकतेचे उत्कृष्ठ लक्षण समजावयास हरकत नाही. अनेक कलात्मक गुणांच्या समुच्चयांनून हा गुण प्रतीत होत असतो. प्रमाणवध्दता, अर्थभारत्व आणि अल्पाक्षरत्व ही या गुणांची लक्षणे होत"१ ही सर्व लक्षणे आपल्याला दिवाकरांच्या नाटयछटेत पहावयास मिळतात. या सर्व गुणांमुळेच त्यांना वाचकांच्या मनावर आपली पकड घट्ट करता आली.

दिवाकरांनी आपल्या नाटयछटेतून विविध प्रकारच्या भाव-भावना असणा-या व्यक्तींची चित्रे रेखाटन असताना त्या-त्या व्यक्तींच्या भावजीवनालाही त्यांचा स्पर्श झाला आहे. अशा व्यक्तींचे जीवन त्यांच्यापुरते मर्यादित न राहाता त्याला प्रतिनिधिक स्वरुप दिवाकरांनी प्राप्त करुन दिले आहे. आणि त्यामुळे नाटयछटांतून आपोआपच मानवी जीवनदर्शन घडविले गेले आहे. हे जीवनदर्शनही व्यक्तीगत पातळीवर न राहाता सामुहिक पातळीवर उतरते. अशा प्रकारे नाटयछटेतून व्यक्तीच्या भावजीवनाचे आणि व्यक्तीजीवनाचेही दर्शन घडते. हे व्यक्तीजीवन व्यापक अशा सामाजिक जीवनाचाच एक अविभाज्य अंशभाग असतो. 'पिण्डी ते ब्रह्मांडी ' या न्यायने जे व्यक्तीजीवनात तेच प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे समाजजीवनात आणि जे समाजजीवनात तेच प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे व्यक्तीजीवनात शक्य व संभवनीय असते. म्हणून एका अर्थी नाटयछटेतून समाजजीवनाचेही दर्शन घडत असते. यादृष्टीने दिवाकरांच्या 'म्हातारा इतुका न । अवघे पाउणशे वयमान ॥' 'कार्ट्या अजून कसें तुला जगातले ज्ञान नाही ?', 'सायकॉलॉजिकली', 'त्यांत रे काय ऐकायचंय्!', 'कोण मेले म्हणजे रडू येत नाही' या छटांतून व्यक्तीजीवना बरोबरच एकूण सामाजिक जीवनाचेही आपल्याला दर्शन घडते. सामाजिकच असे जीवन दर्शन घडवित असताना त्यातून मानवाचे जीवन सुसहय आणि सुकर होण्याच्या दृष्टीने नाटयछटेमधून नकळतपणे काही जीवनयोग्य विचार ही व्यक्त झाले आहेत. साहित्य हे

मानवीमन आणि सामाजिक मन घडविण्याचे कार्य करीत असत. ही घडविण्याची क्रिया वैचारीक पातळीवरुनच होत असते. त्यामुळे त्यातून 'विचार' हा व्यक्त होतोच. दिवाकरांचे नाटयछटेतील विचार पाहाता ते काळाच्या किती तरी पुढे जाणारे असे आहेत. हे त्यांच्या 'बाळ या नारळाला धक्का लावू नकोस!' 'पोरटे मुळावर आलें!', 'झूट आहे सब्!' या छटा वाचल्यानंतर आपल्या लक्षात येते.

अशा प्रकारे नाटयछटेतून जीवनदर्शन घडवित असताना त्या अनुषंगाने आपले विचार व्यक्त करीत असताना पारंपारिक चाकोरी त्यांनी सोडून दिली आहे. आपण आपल्या इतिहासातही पाहातो ज्यांनी ही चाकोरी सोडली. त्याच व्यक्ती या जगाला बरंच काही देऊन गेल्या. चाकोरी सोडलीतरच पायवाटा होतात, आणि पुढे याच पायवाटा राजरस्ता तयार करतात. याची जाणीव दिवाकरांनाही होती. त्यामुळेच त्यांचा 'विचार' काळाच्या पुढे जाण्याचे धाडस करु शकला. अशा पध्दतीने दिवाकरांच्या विचारांचे सामर्थ्य हे कालातीत आहे.

दिवाकरांचे मोठेपण व्यक्त करीत असताना, वा.ल. कुलकर्णी म्हणतात - " खरोखर सर्वार्थाने दिवाकर हे नाटयछटाकार आहेत वरे, दिवाकर जीवननाटयाच्या हया विविध छटा व्यक्त करतात त्यातरी कशा ? तर माणसांना बोलके करुन - माणसांच्या मुखांतून विशिष्ट परिस्थितीत सहजगत्या बाहेर पडणा-या वेचक व सूचक उद्‌गारांच्याद्वारा. आपणास हे उद्‌गार फक्त ऐकू येतात व तद्वारा मानवी मनाचे व हया मानवी मनाने निर्माण केलेल्या बहुरंगी जीवनाचे एकदम अर्थगर्भ दर्शन घडते. हे दर्शन म्हणूनच आत्यंत प्रत्ययकारक असते. साक्षात असते. त्यात अपस्तुताला - वर्णनाला वा निवेदनाला, अलंकाराला यत्किंचितही स्थान नसते. मनो-नाटयाचे साक्षात दर्शन घडविणे एवढाच तेथे हेतू असतो."२

दिवाकरांच्या साहित्याचे अवलोकन करीत असता; त्यातील त्यांची संवेदनशीलता आणि कलाजाणीवा पाहाता ते आजच्या २१ व्या शतकातलेच

वाटतात. म्हणूनच त्यांच्या साहित्याचे नाते त्यांचे समकालीन असणारे खाडीलकर- गडकरी युगाशी ज्याप्रमाणे पूर्णपणे जुळणारे नाही त्याचप्रमाणे उत्तरकालीन फडके-खांडेकर युगाशीही ते जुळणारे नाही. ते जुळते ते फक्त आधुनिक नवतेच्या युगाशी आणि त्यापाठीमागे असणा-या तात्वीक भूमिकेशी. अशा प्रकारे दिवाकरांच्या साहित्यातील त्यांच्या जाणीवा हया नवीन युगाशी नाते जोडणा-या आहेत.

मानवी मनावर होणा-या संस्कारातून माणूस घडत असतो. बाहयसृष्टीत जे घडत असते त्याचा परिणाम माणसाच्या अंतः सृष्टीतही होत असतो अशा बाहय आणि अंतः सृष्टीच्या जडण-घडणीचे कार्य साहित्य करीत असते. त्यादृष्टीने विचार करता, असे दिसते की शेक्सपिअर सारख्या नाटककाराने आपल्या साहित्यकृतीतून पात्रांची मानसिक आंदोलने चित्रीत केली या शेक्सपीअरचे दिवाकर एक जाणते भक्त होते; ते शेक्सपीअरचे एकूण साहित्य जणू कोळून प्याले होते. साहजिकच दिवाकरांच्यावर शेक्सपीअरचा प्रभाव पडून दिवाकरांनीही आपल्या नाटयछटेतून सखोल असणा-या मानवी मनाचे सूक्ष्म परिक्षण करुन विशिष्ट प्रसंगी मानवी मनात उठणा-या वादळाचे चित्रण केले. मानवी मनोवृत्ती, वेळोवेळी उठणारे भाव तरंग, मानसीक आंदोलने आपल्या पात्रांच्याद्वारे चित्रीत करुन मनोविश्लेषणात्मक नाटयछटेची निर्मिती केली. विशिष्ट सूक्ष्म घटनांचा मनावर होणा-या प्रतिक्रिया परस्पर संबंध, पात्रांशी निगडीत देश, काल, निसर्ग, परिस्थिती सूचकतेने व्यक्त करीत असताना दिवाकरांनी माणूस व निसर्ग, मानव व मानवेतर आणि व्यक्ती-व्यक्ती तील संघर्षही चितारला आहे.'महासर्प' या पहिल्या नाटयछटेत मानव व निसर्ग यांच्यातील संघर्ष चितारला आहे. तर 'म्याऊं - म्याऊं - म्याऊं!' या छटेत मानव व मानवेतर प्राण्यातील संघर्षावर प्रकाश टाकला आहे.

अशा प्रकारे दिवाकरांच्या नाटयछटेतून त्यांच्या जाणीवा, पात्रांचे मनोदर्शन, त्या त्या पात्राचे मनोविकार, लालीत्य दर्शन, प्रासादिकता, संवेदना,

संघर्ष, ओजस्विता यासारखे साहित्यगुण व त्यामुळे प्रसंगाला आलेले उठावदारपण हे कुणाही व्यक्तीच्या नजरेत भरावे असेच आहे.

'साहित्य' म्हटले की, त्याला विशिष्ट तंत्राची बंधने ही आलीच. परंतु दिवाकरांच्या नाटयछटेच्या संदर्भात विचार करता असे जाणवते की, तंत्रातून नाटयछटा निर्माण होण्याऐवजी नाटयछटेमुळे विशिष्ट तंत्र निर्माण झाले. आपण एखाद्याच्या खांद्यावर बसतो तेंव्हा आपण चांगले दिसतो परंतु ती उंची आपली नसते हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. दिवाकरांना या गोष्टीची जाणीव होती आणि म्हणूनच त्यांच्या नाटयछटा तंत्रातून निर्माण होण्याऐवजी नाटयछटेतून एक विशिष्ट तंत्र निर्माण झाले. त्यामुळेच नवे, न्यायाचे आणि समतेचे असे काहीतरी ते समाजाला देवून गेले.

दिवाकरांच्या नाटयछटेत कल्पना आणि वास्तव या दोन्ही घटकांचे मिश्रण कसे आहे हे पाहाणे साहित्यदृष्टया महत्त्वाचे आहे. दिवाकरांच्या नाटयछटांमध्ये कल्पनेवर आधारीत अशा काही नाटयछटा पहावयास मिळतात. परंतु या कल्पनेला प्रत्येकवेळी वास्तवतेची जोड मिळाली आहे. प्रत्यक्ष जीवनात जे दुःखाचे, यातनांचे भोग भोगावे लागतात त्यातून वाचकाला क्षणिक समाधान मिळवून देण्यासाठी कलात्मक चित्र नाटयछटेत रेखाटले आहे. प्रत्यक्ष जीवनात जे मिळाले नाही ते सुख, तो आनंद किंवा गत आयुष्यात घडलेले प्रसंग, भेटलेल्या व्यक्ती, प्रेमी जीवन आपल्या कल्पनेच्या जोरावर निर्माण करुन दिवाकरांनी वास्तव आणि कल्पना यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न इतका यशस्वी ठरला आहे की, त्यातून कल्पना वेगळया आणि वास्तव अनुभव वेगळा असे वेगळेपण जाणवत नाही. थोडक्यात नाटयछटेत कल्पना आणि वास्तव यांचे मिश्रण एकजीव झाले आहे. त्यामुळेच त्यांच्या नाटयछटेतून उत्कट अनुभूतीचा कलात्मक अनुभव वाचकाला सतत येत राहतो.

अशा प्रकारे दिवाकरांच्या नाटयछटेवर आणि एकूण साहित्यावर वास्तव वाद, संज्ञाप्रवाह, अस्तित्ववाद, सौंदर्यवाद, अभिजातवाद या सर्व वादांचा

परिणाम झालेला दिसतो आणि म्हणून त्यांच्या साहित्याचे नाते नवतेच्या युगाशी जोडले गेले.

**नाटयछटेतील सौंदर्य :**

नाटयछटेच्या अंतरंगाचा विचार करता त्यातील सौंदर्याचा अभ्यास हा अपरिहार्य ठरतो. त्यादृष्टीने सौंदर्य म्हणजे नेमके काय? सौंदर्य कशाला म्हणावयाचे? याचाही अभ्यास करणे गरजेचे आहे.

सौंदर्य म्हणजे सुखद अशी संवेदना उमटणं, आस्वादनाची अनुभूती येत राहणं होय. अशा सौंदर्याची अनुभूती पुढील काव्य पंक्तींतून आपल्याला येते -

' महाराष्ट्र कवि परंपरा
खंड न पडला तिला जरा
उणिव रसिकांचीच परी
आज भासते खरोखरी.'

अशा या सौंदर्याची उपासना महाराष्ट्रात तर अखंडपणे चालत आलेली आहे. सुडौल रेषा आणि भावदर्शी मुद्रा यांनी अतुलनीय ठरलेली अजिंठयाच्या लेण्यांतील चित्रकला आणि वेरुळच्या लेण्यांतील पाषाणशिल्पांची गतिमानता यांना जगात कुठे तोड नाही. प्राचीन काळी जेवढी त्यातून रसिकांना आस्वादनाची अनुभूती येत होती तेवढीच आजच्याही रसिकांना अनुभूती येत रहाते. म्हणून तर सौंदर्य हे पा-याप्रमाणे असते असे म्हटले जाते. सौंदर्याची सुखद अशी संवेदना केवळ शिल्प, स्थापत्य, चित्रकला यातूनच येते असे नाही तर अशी सुखद सेवंदना व्यक्तीला एखाद्या चांगल्या साहित्यकृतीतूनही येत राहाते. शंभरपेक्षा जास्त वर्षांच्या रंगभूमीच्या इतिहासात 'सौभद्र', 'शारदा', 'संशयकल्लोळ', 'एकच प्याला', 'स्वयंवर', 'मानापमान', 'किचक वध', 'भाऊबंदकी', 'लग्नाची बेडी', 'आंधळयाची शाळा', 'कुलवधू' यासारखी अनेक उत्तमोत्तम नाटके निर्माण झाली. यासर्व नाटकातून ज्याप्रमाणे रसिक वाचकाला सौंदर्याची पचिती येते त्याच प्रमाणे दिवाकरांच्या नाटयछटेतूनही

सौंदर्याची प्रचिती येते. नाटयछटेतील सौंदर्याचा अस्वाद घेण्यासाठी आपल्याला नाटयछटेचा प्रायोगिक अंगाने विचार करावा लागेल. नाटयछटा सादर करीत असताना नाटकाप्रमाणे यात अनेक पात्रं असतं नाहीत. सादर करताना रंगभूमीवर फक्त एकच पात्र काम करीत असते. इतर पात्रे गृहीत धरलेली असतात त्यामुळेच नाटयछटा आणि नाटक यात प्रायोगिकतेच्या दृष्टीने जरी साम्य असले तरीसुध्दा नाटयछटा ही अभिनेत्याच्या दृष्टीने आव्हान ठरते. अलिकडच्या काव्य आणि चारोळी यात जेवढे साम्य आहे तेवढेच नाटक आणि नाटयछटा यात साम्य आहे.

दिवाकरांच्या नाटयछटेचा अभ्यास करीत असताना काही तंत्र गृहित धरावे लागते. आणि जेंव्हा कलाकृतीत असे काही तंत्र येते तेंव्हा त्या कलाकृतीतील भावनेला बांध पडत असतो तरीदेखील दिवाकरांनी आपल्या नाटयछटेतील भावनेला वाट करुन देत असताना सोपेपणा कायम ठेवला आहे. आणि जाणकारांच्या विचारांची अंग अधिक विस्तृत करण्याचा प्रयत्न सहजतेने केला आहे. एखादा जीवनातील अनुभव तेवढयाच उत्स्फूर्तपणे ते चित्रित करतात. त्यामुळेच त्यांच्या छटांमधून भावस्पर्शी अशा उत्कट अनुभूतीचा कलात्मक अनुभव येत राहातो. मग त्यांत प्रसंगी विरोधाभासातून सौंदर्य निर्माण केलेले असते तर कधी मानवी कल्पनात्मक कल्पनेतून, उपहास, उपरोधात्मक असे सौंदर्य साधलेले असते. उदा. 'स्वर्गातील आत्मे' या छटेतील शेवटचे वाक्य - 'अगं आपलेंच काय, कंटाळा आला की देवसुध्दा जातो तिथे !' या वाक्याने कंटाळवाण्या स्वर्गाच्या कल्पनेला दिलेला कल्पक आधार छटेची उंची जास्तच वाढवतो.

दिवाकर जीवनातील एखादा अनुभव चित्रित करीत असताना त्यातील त्यांचे निरीक्षण किती सूक्ष्म होते हे तर आपल्याला पाहावयास मिळते परंतु त्या-त्या छटेचा विषय निवडण्यातले सौंदर्यही प्रकर्षाने आपल्याला जाणवत राहते. उदा. 'पाण्यातील बुडबुडे' या छटेत जीवनाची क्षणभंगुरतासुध्दा अनेक रंगच्छटातून स्पष्ट करता-करता माणसाच्या कर्तृत्वाचे महात्म्य ही सहजपणे

त्यांनी प्रकट केले आहे. ही नाटयछटा अभ्यासल्यानंतर सहज जाणवते की, खरोखर सौंदर्य हे मृगजळाप्रमाणेच असते.

दिवाकरांच्या 'मग तो दिवा कोणता?' या छटेतून सौंदर्य हे कसे गुढतेच्या जवळ जाणारे आहे याचा प्रत्यय आपल्याला येतो. 'अरेरे! ओझ्याखाली बैल मेला! धावा!' या छटेत माणूस जगण्यातला आनंदा सोडून महत्त्वकांक्षेच्या नावाखाली गुराढोरांसारखा नुसताच कसा राबत राहातो ते आपल्या सौंदर्यपूर्ण नेटक्या शैलीने सहजरीत्या दिवाकरांनी चित्रित केले आहे.

नाटयछटेतून दिवाकरांचे परमन प्रवेश करण्याचे सामर्थ्य वाखाणण्याजोगे आहे. असे परमन प्रवेश करुन हुबेहूब पात्रसृष्टी तर त्यांनी निर्माण केलीच, परंतु त्या-त्या व्यक्तीच्या नाजूक हालचालींसह ते चित्रमयतेने वाचकांसमोर साकारही केले. स्त्रीया हया मूलतः च भावना संपन्न अशा असतात. तेंव्हा अशा स्त्रीयांच्या भावजीवनातील एखाद्या आनंदाच्या क्षणी; मग त्या कशी चित्रे रेखाटतात; स्वप्न पाहातात त्याचे चित्र 'चिंगी महिन्याची झाली नाही तोंच?' या छटेत मिष्किल शैलीत पाहाव्यास मिळते. दिवाकरांची प्रस्तूत छटा म्हणजे जणू सौंदर्याची खाणच आहे. चिंगीच्या आईच्या बोलण्यातील लाडीक तोरा, मनोराज्यांतला भाबडेपणा, 'चिंगी' या नावाची निवड या सर्वच गोष्टी नाटयछटेतील सौंदर्य वृध्दिंगत करतात.

नाटयछटेतील प्राणी, पक्षी त्या-त्या व्यक्तीच्या स्वभावाला, भाषेला अनुलक्षून स्वाभाविकता ही आलेली आहे. या स्वाभाविकतेमुळे नाटयछटेला जिवंतपणा आलेला अहो. आणि म्हणूनच पूर्वजन्मींची आइ असून देखिल 'म्याऊं-म्याऊं-म्याऊं' या छटेतील मांजर आपल्या मुलीच्या घरातून टोक्यात लाटण्याचा प्रसाद खाऊन बाहेर पडते. स्वाभाविकच तिला आपल्या मुलीसमोर आपले पूर्वजन्मीची आईपण सिध्द करता आले नाही. कुंभारदादांच्या तोंडी दिवाकरांनी तद्न पांढरपेशी भाषा वापरली आहे. ती तशी वापरली म्हणूनच त्यातील नेमका आशय व्यक्त करण्यात दिवाकर यशस्वी होऊ शकले. मुळातच या छटेतील आशय त्या व्यवसायापूरता मर्यादित न राहता त्या पलिकडे जाणारा

आहे. आणि म्हणून कुंभारदादांच्या तोंडी असणारी भाषा त्या विषयाला अनुलक्षून आहे. इथे जर कुंभारदादांचीच 'भाषा' वापरली असती तर कदाचित त्या भाषेखाली ती छटाच चिरडून गेली असती. अशा प्रकारे मानवी स्वभावाशी, भाषेशी, विचाराशी निगडीत त्यात स्वाभाविकता आली आहे.

सौंदर्य हे पारदर्शी पेपरवेट सारखे असते. साहित्यातून ते वेगवेगळया अंगाने दिसत असते. जाणवत असते. मग ते जीवनाच्या अंगाने असो की, भावनेच्या असो किंवा विचाराच्या अंगाने असो ते व्यक्त होत असते. दिवाकरांनी आपल्या नाटयछटेत सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील साधेसाधे अनुभव नाटयात्मक रितीने चित्रित केले आहेत. त्या दृष्टीने त्यांच्या 'एका हलवायाचे दुकान' आणि 'अहो, आज गि-हाईकच आलें नाही!' या दोन नाटयछटेतील जीवनानुभव अभ्यासण्याजोगे तर आहेतच, परंतु असे जीवनानुभव चित्रित करीत असताना त्यातून जे सौंदर्य निर्माण झाले आहे ते अप्रतिम असेच आहे. हलवाई हा साखरेची पाखरे करण्यात तरबेज आहे. शिवाय ही पाखरे तर गोड आहेतच परंतु माझे कामही तितकेच 'गोड आहे' हे रावसाहेबांना सांगायलाही तो विसरलेला नाही. पण नेमके त्याचवेळी घरात पोरांचा चाललेला गोंधळ पाहून वैतागलेला हा हलवाई म्हणतो - 'अरे पोरटयांनो, तुम्ही गप बसतां की नाही ? का या चुलीत घालून तुम्हा सगळयांना भाजून काढूं? तुमची आई कोठें जळाली वाटते ?' अशा त-हेने घरात मात्र हा हलवाई त्रिस्तव आहे. या उलट 'अहो, आज गि-हाईकच आलें नाहीं!' यातील गोव-या विकणारा दुकानदार मात्र जीवनात येणा-या विविध समस्यांना विशेष चीड व्यक्त न करता सामोरा जाताना दिसतो. गावात प्लेगची साथ आलेली असताना या गोव-या विकणा-या दुकानदारांजवळ मात्र दारुलांबी खिशात पैसे नाहीत. असे असतानाच गोव-या वाहण्यावर पोट भरणारी कोंडाबाई काम नाही म्हणून त्याच्याजवळ कुरकुरते आहे. तर घरात तेल, मीठ नाही म्हणून बायको मागते आहे. शिवाय दिलेले पैसे वसुल कसे करायचे यादृष्टीने शेठजी तगादा लावतो. परंतु या सर्व परिस्थितीवर दुकानदार मात्र न वैतागता 'उदया सध्याकाळच्या आत सगळे पैसे

चुकते करता!' असे मोठया आत्मविश्वासाने सांगतो. अशा प्रकारे जीवनातील सूक्ष्म नाटय भडक रंग न देता व्यक्त केल्याने या दोन छटांतून सौंदर्य निर्माण झाले आहे. 'अशा शुभदिनी रडून कसें चालेल' या छटेत विधवेच्या मनातील विविध भावना चित्रित करुन कारुण्यातून सौंदर्य साधण्याचा प्रयत्न दिवाकरांनी केला आहे. याच प्रमाणे 'बाळ! या नारळाला धक्का लावू नकोस बरें!' यातील वेणूच्या बालीश भावना तितक्याच बालीशपणे व्यक्त केल्याने त्या एकूण छटेलाच सौंदर्य प्राप्त झाले आहे.

दिवाकरांना सौदर्यदृष्टी लाभली होती हे त्यांच्या स्वभाववैशिष्टयांवरुन आपल्याला जाणवते. त्यांच्या खोलीची टापटीप, वस्तूच्या रचनेतील निटनेटकेपणा यातून आपल्याला त्यांची सौंदर्यदृष्टी जाणवते त्यांच्या विचारातूनही सौंदर्याचा साक्षात्कार आपल्याला होतो. 'दिव्याभोवती पतंग उडत आहे!' या छटेतून त्यांना हेच सांगावयाचे आहे की, प्रेम जाणीवे मध्ये पूर्णतः कलह आणि दुःख कधी असत नाही. हा आपला विचार सांगण्यासाठी त्यांनी कल्पनेची जोड देवून बोलक्या प्रतीकांच्याद्वारे एका भव्य, भरीव अशा आशयाला अभिव्यक्त केले आहे. त्यामुळे विचाराला एक प्रकारचे सौंदर्य प्राप्त झाले आहे.

दिवाकरांची 'रिकामी आगपेटी' ही खरे तर निपात्री संवाद आहे. परंतु तिला नाटयछटा या विभागात अंतर्भूत केली आहे. या संवादातूनही दिवाकरांनी सौंदर्याचा साक्षात्कार घडविला आहे. आपल्या सत्तर मुलांच्याकडून हे जग कसे आहे हे जाणून घेणारी दिवाकरांची ही आगपेटी रिकामी आहे. 'काय पेपर चोरीला गेले ?' या छटेतील संवाद हे कथानकाला गती देणारे, स्वभाव निदर्शक आणि ओघाने व्यक्त झालेले आहेत. स्वतः दिवाकरांच्याही नकळतपणे या छटेत 'बस् ! आज मैं तो बादशहा हूँ!' हा हिंदीतील संवाद अससल मराठमोळया नाटयछटेत आला आहे. त्यामुळे त्यातील सौंदर्य अधिकच खुलले आहे.

दिवाकरांनी आपल्या पहिल्या काही नाटयछटांना, नाटयछटा न म्हणता 'प्रसंग' असे म्हटले होते. आपल्या नाटयात्मक अनुभवातूनच त्यांनी हे

प्रसंग चित्रित केले होते. हे प्रसंग आपल्या समोर प्रत्यक्ष घडत आहेत असे वाटण्याइतपत त्यात जीवंत पणा दिवाकरांनी ओतला आहे. जवळ-जवळ कमीअधिक फरकाने त्यांच्या सर्वच नाटयछटांमधून असे प्रसंग पाहावयास मिळतात. जीवनातील साध्या-साध्या गोष्टीही यातून सुटलेल्या नाहीत. उदा. 'पाण्यातील बुडबुडे','किती रमणीय देखावा हा!-पण इकडे ?', 'झूट आहे सब्' यासारख्या छटांत अगदी निमिषांर्धात घडणा-या घटनासुध्दा दिवाकरांनी चित्रित केल्या आहेत. या संदर्भात सरोजनी वैद्य म्हणतात - " ज्या एका नाटयात्मक प्रसंगाची योजना दिवाकरांनी केलेली असते तो लेखकाच्या, किंवा बोलणा-या पात्राच्या मनोविश्वात वा वास्तव जीवनात आपल्या समोर प्रत्यक्षच घडत असतो. त्यात त्या पात्राची एखादी - दुसरी लहानशी हालचाल किंवा कृतीही असते.त्या पात्राची एखादीच भाववृत्ती स्वतः च्या नजरेतून दिवाकरांना आपल्या पुढे मूर्त करावयाची असते "३

'अरेरे! ओझ्या खाली बैल मेला! धावा!!', 'महासर्प' यासारख्या छटातून दिवाकरांनी मुक्या जनावरांच्या मनात चाललेला भावकल्लोळही चित्रित केला आहे. आणि त्यातून उत्कट अशा सौंदर्याची निर्मितीही केली आहे. 'बोलावणं आल्याशिवाय नाही!' यातील विद्यार्थी दशेतील नटाच्या अभिनिवेशातूनही एक प्रकारचे सौंदर्य प्रतीत होताना दिसते. एखाद्या छटेत उत्स्फूर्तता जर कुठे खंडीत झालेली नसेल तर अशा नाटयछटेतूनही सौंदर्य पाहावयास मिळते. उदा. 'फाटलेला पतंग.' एवढेच नव्हेतर वस्तु, निसर्ग, वातावरण अशी कलाकृती म्हणून नाटयछटेची जेवढी अंग असतील तेवढया सर्व अंगानी त्यातील सौंदर्य दिसते.

दिवाकरांना आपल्या नाटयछटेतून आत्मशोध घेता-घेताच जगताचाही शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे आणि म्हणूनच त्यांच्या नाटयछटा आणि एकूण वाङ्.मय हे केवळ मनोरंजन करण्याच्या उद्देशाने मुळीच लिहिलेले नाही. निदान त्यांच्या नाटयछटा वरवर जरी बालीश मनोरंजनात्मक वाटत असल्या तरी त्यात दैव दुर्लक्षित हृदयाचे आर्त हुंदके आहेत. माणूस व्यक्तीशः

कितीही महत्त्वकांक्षी, श्रीमंत असला तरी जीवनाच्या वावटळीत त्याच्या आयुष्याचा पतंग हा फाटलाच जातो. पुन्हा हाच फाटलेला पतंग सांगतो, 'अरे माणसा गर्व करु नकोस, भरा-या मारु नकोस. नाहीतर असा फाटून ..... जन्मभर रडत बसशील!.....' हाच माणूस जगण्यातील आनंद सोडून महत्त्वकांक्षेच्या नावाखाली गुराढोरांसारखा नुसताच राबत राहतो. या ओढाताणीने त्या बिचा-या जीवाची होणारी दुर्दशा आणि असंतोषाने रात्रंदिवस डोकी कोरुन टाकलेली ही मनुष्यसृष्टी आणि हृदय वरचेवर भरुन येते. दिवाकरांच्या मनात आलेले डोळयाच्या अधूपणापोटीचे विचार मनाला तितकाच उबग आणतात. असे पूर्ण निराशाजनक विचार त्यांच्या मनात येतात. एखादे वेळेस दुःखात सुख म्हणून त्यांना सुवर्णयुगाचे लोभस स्वप्न पडते. पण ते क्षणिकच टिकते. दुस-याच क्षणी त्यांना प्रेतांचा डोंगर दिसतो. त्यावर चढण्यासाठी चढाओढ लागलेली दिसते. त्यातच भर त्यांच्यात कत्तली सुरु होऊन कडाडणा-या रक्तात तडातड आत्मे उडताहेत. कोणी एक अज्ञात शक्ती लांबलचक मुंडक्यांची माळ गळयात घालून नरडयावर उभी राहिली आहे. असे विचित्र भेसूर चित्र दिसते. आणि म्हणूनच ते देवाला जाब विचारतात या जगात आनंद कोठे आहे? त्यापेक्षा देवा मीच मंगळ जर जन्माला आलो नसतो तर बरे झाले नसते का?

संपूर्ण शांती ही मानवाच्या स्थीर प्रज्ञेची अवस्था होय.परंतु सामान्य माणूस ऐहिक सुखाच्या अनेक सापेक्ष जाणींवामध्ये एवढा गुरफटलेला असतो की, तो या निरामय शांततेचा अनुभव घेऊच शकत नाही. आणि मग त्याच्या मेंदूत अनेक किडे वळवळायला लागतात. त्याचा भडका उडतो आणि शांतता हरवते. त्या सगळयाची समग्र जाणीव शेक्सपीअर आणि ब्राउनिंग यांनी आपल्या प्रज्ञेतून जोकलेली आहे. तेंव्हा हे असे मेंदूतील वळवळणारे किडे म्हणजेच दिव्यातील घाण त्यांच्यावर पडू नये अशी प्रगल्भ श्रध्दाशील जाणीव दिवाकरांच्या या नाटयछटेत येते. तेंव्हा एक अत्यंत प्रज्ञासंपन्न नाटयछटाकार कसा नम्र विनयशील होताना दिसतो.

दिवाकरांची वृत्ती ही नाटयानुकूल आणि अंर्तमुख होतीच परंतु ते तितकेच भावुकही होते. अशा नाटयानुकूल मनोवृत्तीचे कलावंत जगाकडे लांबून पाहात असतात. या उलट भावनाशील मनोवृत्तीचे कलावंत जगाकडे लांबून पाहाण्याऐवजी त्या जगात एकरुप होऊन जातात. दोघेही कलावंत असतात परंतु नाटयानुकूल मनोवृत्तीचे नाटयपर असे लेखन करतात. तर भावनाशील वृत्तीचे कलावंत कथनपर असे लेखन करतात. या दोन्ही वृत्तींचा सुंदर मिलाफ दिवाकरांच्या वृत्तीत झाल्यामुळे त्यांच्या नाटयछटेतून आत्मशोध घेता-घेताच जगताचाही शोध घेतला गेला आहे आणि म्हणूनच जीवनातील प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक मन लावून, शब्द, वेळ यांची बंधने सांभाळून नाटकापेक्षाही अवघड, अव्हानात्मक नाटयछटेसारख्या नव्या वाङ्मय प्रकाराला ते जन्म देऊ शकले. आणि त्यातून नाटयात्मकता, भावनात्मकता, उत्स्फूर्तता, चित्रात्मकता यासारखी साहित्याची नवीन अंग/लक्षणं प्रदर्शीत करुन आपले मोठेपण सिध्द केले. हिमालयाच्या उंची एवढी हिमालयाची सावलीही उंच असावी लागते त्याप्रमाणे दिवाकरांच्या मोठेपणाला साजेशा अशा त्यांच्या नाटयछटा ही मोठया आहेत हे आपल्याला मान्यच करावे लागते.

## नाटयछटेतील कला सौंदर्य :

पुराणकाळापासून चौसष्ट कला मानण्यात आलेल्या आहेत. अलिकडे पासष्ठावी कला म्हणून जाहिरातीचा उल्लेख केला जातो. यापैकीच 'साहित्य' ही एक कला आहे. आणि 'कला' ही एक प्रक्रिया आहे. ती सृजन आहे; नवनिर्मितीक्षम अशी आहे. अशा साहित्य आणि कला यांना आपले बळ आणि निष्ठाशक्ती जीवनापासून लाभते. आणि कोटयावधी लोकांच्या मनावर आणि अंतःकरणावर प्रभाव पाडण्याची क्षमता साहित्याला, कलेला लाभते. आणि म्हणूनच साहित्य आणि कलेला प्रतिनिसर्ग असे म्हटले जाते.

कला सौंदर्य म्हणजे नेमके काय ? तर जे दिसते, सुचते आहे पण जे नवीन आहे ते म्हणजे कला सौंदर्य होय. ज्या गोष्टींचा सौंदर्यपूर्ण आणि आकर्षक असा अविष्कार होत असतो त्याला कला म्हणावे. उदा. चित्रकला. अशी

कला जिथे थांबते तिथे कलाकृतीला सुरवात होते. आपल्याला इथे दिवाकरांच्या 'नाटयछटा' या कलाकृतीचे कला सौंदर्य पाहावयाचे आहे.

नाटयछटेत दिवाकरांच्या उपजत असणा-या प्रतिभाशक्तीचा अनुभव येतो. सूक्ष्म बुध्दीलाच आकलन होईल असा गहन विचार आणि त्याच्या तितकाच तरल अनुभव या दोहोंचा संगम नाटयछटेत झालेला आहे. अशा सूक्ष्म तरल अनुभवाला अभिव्यक्ती देताना त्यांना पार्थिवाचा आश्रय घ्यावा लागतो. पण तसा पार्थिवाचा आश्रय घेऊनही दिवाकरांना अभिप्रेत असणारा आशय मात्र अपार्थिवच राहातो. त्यांच्या 'किती रमणिय देखावा हा ! - पण इकडे ?' या छटेत दोन विसंगत उदाहरणाने मानवी जीवनातील क्षणभंगुरता नेमकेपणाने टिपली आहे. एकीकडे सुवर्णमय अशा त्यांना इच्छित असणा-या सुवर्णयुगाचे स्वप्न पडते. या स्वप्नात ते स्वतः तर हरवून जातातच; पण वाचकही स्वतः ला विसरतो. ते ही किती क्षणभरच. जगाला विसरुन आनंद घेत असताना निसर्गातील लावण्याने त्यांचे मन भरुन येते. 'भगवति, तुझ्या या वनसृष्टीचा प्रेमळ आत्मा, आकाशांत प्रकाशणा-या या स्वर्गीय आत्मार्शी एकरुप होऊन गेल्यामुळे 'अहाहा! काय चोहोंकडे प्रेमाचा उज्ज्वल - शांत ! असा हा प्रकाश पडला आहे; परंतु एक क्षणभरच ही वृत्ती टिकते ना टिकते तोच त्याचे मन खडबडून जागे होते. कल्पनेने जाणवलेली सत्ये नाहीशी होतात आणि समोर दिसते ती जीवनाती भेसूर वावटळ. दिवाकरांच्या जाणीवेने आकळलेला येथील आशय किती सूक्ष्म, तरल आहे, ज्ञान-अज्ञानाच्या अतीत असलेल्या अपार्थिवाचे केलेले हे या छटेतील वर्णन वाचताना आपल्याला आपणच हरवून गेल्यासारखे वाटते. पण तरीही काहीतरी जाणवत असल्यासारखे भासते. मात्र त्यातील तरल आणि गहण असा आशय मनाला जाणवतो ना जाणवतो एवढयात पुढच्याच क्षणाला तो आपल्या आकलनातून निसटतो. जाणीव आणि नेणीव यांच्या सीमारेषेवर आपले मन घोटाळत आणि घुटमळत राहते. इंद्रियगोचर, इंद्रियगम्य अशा अनुभवाच्या कक्षेतच वावरण्याची सवय असलेल्या आपणाला अतिंन्द्रीय फार काळ पेलवत नाही. परंतु दिवाकरांच्या नाटयछटेच्या माध्यमातन क्षणभर का

होईना तेथवर जातो. जे इंद्रियांच्या पलीकडचे आहे ते देखिल संवेदनांच्या द्वारे व्यक्त करतात त्यामुळे त्याला विशेष सौंदर्य प्राप्त झाले आहे.

दिवाकरांनी आपल्या निरीक्षण शक्तीचा वापर कसा केला आहे हे त्यांच्या नाटयछटेतून प्रकर्षाने जाणवते. बंबातून उडणा-या ठिणग्या, पाण्यातील बुडबुडे पाहिले की दिवाकरांनी कुठल्या निरिक्षणाचा कुठं उपयोग केला आहे हे आपल्या लक्षात येते. शिवाय त्यांच्या नाटयछटेतून मानवी जीवनाशी निगडीत अशा भाव-भावना आलेल्या आहेत. या भावना चित्रित करतानाच त्यातून त्यांनी आपल्या मोठेपणाला शोभतील आणि काळाच्याही पुढे जाऊ पाहाणारे असे विचार व्यक्त केले आहेत. साहजिकच त्यांच्या नाटयछटेत आशय व्यक्त करण्यासाठी ज्या कल्पना वापरल्या आहेत त्या चराचराशी निगडीत अशा आहेत. याच कल्पनाशक्तीवर प्रतिभाशक्ती आरुढ झालेली असते. कल्पनाशक्ती ही एक संपूर्ण नवनिर्मिती साधणारी शक्ती होय.

आपल्याकडून सुटलेले जीवनातील क्षण कलावंत पकडतो आणि म्हणूनच निमिषार्धातले सौंदर्य त्याला दिसत असते. असे सौंदर्य प्रत्येक नाटयछटेतून आपल्या प्रत्ययास येते. त्यात प्रतिमा, प्रतिके, वेगवेगळी चिन्हे- डॅश, उद्‌गारवाचक, प्रश्नचिन्हे, रुपके आणि आशय यांचे दिवाकरांच्या व्यक्तीमत्त्वात मुरुन एकजीव झालेले रसायन जाणवते.

**नाटयछटेतील सेंद्रियत्व :**

मानव ही परमेश्वराची कलाकृती आहे; त्याचप्रमाणे साहित्य ही मानवाची कलाकृती आहे. साहित्य सेंद्रिय आहे असे आपण म्हणतो, कारण साहित्यातून भावना, संवेदना प्रकट होत असतात. साहित्य हे अनेक सुसंघटनांनी बनलेले असते. त्यामुळे ते स्वतंत्र व स्वयंपूर्ण आहे.

सेंद्रियत्व म्हणजे; साहित्यात अखंडीत व्यक्त झालेले विचार, भावना, कल्पना होय. असे सेंद्रियत्व साहित्यात असावेच लागते. साहित्यात घटना घडताना इंद्रिये चेतन होतात. स्पर्श, दृक, श्रवण, संवेदना प्रफुल्लित होतात. म्हणजेच साहित्य हे चैतन्याने भरलेले असते त्यामुळे असे साहित्य

वाचत असताना ऐहिक जीवन तेवढ्यावेळापुरते का होईना आपण विसरतो. लौकिक जीवनातून आपण अलौकिकात प्रवेश करतो. 'वर्ड्सवर्थचे फुलपाखरु' सारखी नाटयछटा वाचत असताना आपल्याला असाच अनुभव येतो. याशिवाय 'झूट आहे सब', 'अरेरे! ओझ्या खाली बैल मेला! धावा !!' या सारख्या छटांतूनही असाच अनुभव येतो. या छटा वाचत असताना आपण त्या जगात प्रवेश करतो व छटेच्या आखेरपर्यंत त्या जगात राहातो आणि वावरतोही. या जगात वावरत असताना आपल्याला हया दैनंदिन, ऐहिक जीवनाची आठवणही होतच असते, परंतु त्याच बरोबर आपण ज्या जगात वावरत असतो ते एक वेगळे जग आहे हेही जाणवत असते. थोडक्यात दिवाकरांच्या नाटयछटा सेंद्रिय आहेत. एक-एक नाटयछटा म्हणजे एक-एक सौंदर्यकृती आहे.

साहित्याचे माध्यम 'शब्द' आहे. लेखक, कवी किंवा नाटयछटाकार आपल्या अनुभवांची पुनर्निर्मिती शब्दांच्या आधारेच साधताना दिसतो. त्यामुळे 'शब्द' या घटकाला साहित्याच्या विश्वात एक अनन्यसाधारण स्थान प्राप्त झालेले दिसते. 'भामह' या संस्कृत साहित्य तज्ञाने काव्याची व्याख्या करताना म्हटले आहे -

"शब्दार्थो संहितो काव्यम्|"

म्हणजेच शब्द आणि अर्थ यांचे सहितत्व म्हणजे काव्य असे भामह या साहित्यतज्ञाला सुचवावयाचे आहे. ललित साहित्यात शब्दांना भावनात्मक अनुभूतीची निर्मिती साधावी लागते. त्यामुळे तिथे सूचितार्थाला महत्त्व असते. यादृष्टीने दिवाकरांच्या नाटयछटेचा विचार करता त्यातील शब्दांची निवड, वाक्यांची रचना, मांडणी अभ्यासण्याजोगी आहे. 'एका हलवायाचे दुकान' यातील 'साखरेची पाखरे','कावळयाच्या पंखाचा तुकडा'; 'मग तो दिवा कोणता?' यातील 'काजळाचा बर्फ', 'किडयांचा बुजबुजाट'; 'किती रमणिय देखावा हा!-पण इकडे?' यातील 'प्रेतांचा पर्वत', 'कडकडणारे रक्त', 'तडातड उडणारे आत्मे', 'रक्ताचा महासागर', 'मुंडक्यांची माळ' यासारखे मार्मीक शब्दप्रयोग ती-ती छटा उलगडून दाखविण्यास मदत करतातच परंतु यातून

आपल्या डोळयासमोर अनुभवाकृती येते व त्यातूनच साहित्याची आकृती आपल्या पुढे उभी राहते.

दिवाकरांच्या नाटयछटा आकाराने खूपच लहान आहेत. नाटयछटेतून प्रामुख्याने मानवी मनातील उत्कट भावकल्लोळांना, तरल कल्पनांना आणि मानसिक विचार तरंगांना अत्यंत उत्कट स्वरुपात परंतु विशिष्ट अभिनिवेशातून शब्दरुपांत साकार केलेल असते; आणि त्यातून दृश्यात्मकताही निर्माण झालेली असते. थोडक्यात उत्स्फूर्तपणे नाटयछटेची निर्मिती होत असते. नाटयछटेत हे सर्व गद्यमय माध्यमातून सूचित होत असते. हेच काव्यात पद्यमय माध्यमातून व्यक्त केलेले असते; फरक काय तो एवढाच असतो. आणि म्हणूनच दिवाकरांच्या नाटयछटेचे काव्याशी असणारे नाते अगदी जवळचे आहे. नाटयछटेचा काव्याशी असणारा अनुबंध हा जुळया भावंडासारखा आहे.

दिवाकरांच्या नाटयछटेत दिसणा-या प्रतिमा हया वास्तवलक्षी अशा आहेत. एकाच वेळी अनेक बाबींना स्पर्श करण्याचे काम या प्रतिमा करीत असतात. या दृष्टीने त्यांच्या 'एका हालवायाचे दुकान' या छटेतील प्रतिमा फार बोलक्या आणि नेमका सूचित अर्थ व्यक्त करणा-या आहेत. अशाप्रकारे अनेक संदर्भ, सूचकता, व्यापक विषय आणि तो ग्रहण करण्याची क्षमता हे सर्व व्यक्त करणारी प्रतिमा आपोआपच प्रभावी ठरते आणि प्रभावतच सौंदर्य एकवटलेले असते.

दिवाकर नाटयछटेतून रुपके, प्रतिमा यांच्याद्वारे विचार करताना दिसतात. जणू त्यांची भाषाच या अलंकाराची आहे. रुपके किंवा प्रतिमा त्यांना शोधाव्या लागत नाहीत. तर त्या सहजपणे त्यांना स्फूरतात. पावसाळयात ज्याप्रमाणे सगळीकडे हिरवीगार, लुसलुशीत हिरवळ तरारते तशी रुपके आणि प्रतिमा त्यांच्या नाटयछटेत तरारतात. आणि म्हणूनच त्यांच्या नाटयछटा लावण्यपूर्ण सौंदर्याने नटलेल्या आपल्याला दिसतात.

# संदर्भ ग्रंथ सूची


| अ.न. | पुस्तकाचे नांव | लेखक |
| --- | --- | --- |
| १. | दिवाकरांच्या वाङ्‌मयाचे स्वरुप | वा. ल. कुलकर्णी<br>ज्योत्स्ना - ऑक्टोबर<br>१९३७ |
| २. | समग्र दिवाकर | सरोजिनी वैद्य |
| ३. | दिवाकरांच्या नाटयछटा | विजय तेंडूलकर |
| ४. | नाटयछटा व दिवाकर | आलोचना जुलै १९६५<br>सल्लागार मंडळ<br>अनंत काणेकर<br>पु.ल. देशपांडे<br>मं. वि. राजाध्यक्ष<br>पु. शि. रेगे |